महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८६ वा | दिनांक : २८/१२/२०२४ | वार : शनिवार

## वागणूक चांगली मिळाली नसल्याने छगन भुजबळ नाराज : नरहरी झिरवळ



**नाशिक :** राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटातील ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे नाराज असल्याचे स्पष्ट झाले आहे. छगन भुजबळ यांच्या नाराजीवर अन्न व औषध विभाग मंत्री नरहरी झिरवळ यांनी मोठे विधान केले आहे. वागणूक चांगली मिळाली नसल्याने भुजबळ नाराज असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चेला आणखी तोंड फुटले आहे.

मंत्री नरहरी झिरवळ म्हणाले, छगन भुजबळ नाराज असताना मी त्यांना भेटलो. जी वागणूक मिळलाई त्यामुळे ते नाराज आहेत. वागणूक चांगली दिली जात नाही असे ते म्हणाले. त्यावर मी त्यांना सांगितले तुम्ही सर्वात मोठे आहात, तुम्ही आमच्यासाठी वेगळा निर्णय घेऊ नका. राज्यसभा देऊ अशी चर्चा आहे, असे मी बोललो तर त्यांनी राग व्यक्त केला. आता समाजात वातावरण गढूळ झाले आहे. आता मला राज्यसभेवर पाठवत आहेत, असे भुजबळ म्हणाले होते, अशी माहिती नरहरी झिरवळ यांनी दिली आहे.

दरम्यान, बनावट औषधे विक्री प्रकरणी देखील नरहरी झिरवळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नरहरी झिरवळ म्हणाले, बनावट औषधे विक्री केली जात आहे. हे प्रकरण काय आहे ते बघून त्यावर बंधन घालणार आहे. लोकांच्या जीवन मरणाशी निगडीत खाते मला मिळाले आहे, त्यामुळे त्याला न्याय देणार. भेसळ थांबवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे झिरवळ यांनी आश्वासन दिले आहे.

पुढे बोलताना नरहरी झिरवळ म्हणाले, आधी आमच्या भागात हार्ट अटॅक, ब्रेन ट्यूमर हे विषय माहिती नव्हते पण आता जाणवत आहेत. आदिवासी खाते मला मील असे वाटत होते पण मिळाले नाही, अशी खंत देखील त्यांनी बोलून दाखवली आहे. या आधी अनेकांना खाते सांभाळून न्याय दिला. पण त्यात काही बदल करण्याची आवश्यकता आहे. मी आदिवासी मंत्री नसलो, तरी मी काही सूचना करेल, मी मंत्रिमंडळात आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

नरहरी झिरवळ म्हणाले, गॅस योजना आता सुरू झाली, आधी फुकणी असायची. चूल पेटवली जात होती, त्यातून महिलांच्या पोटाचे आजार वाढले होते, ते दूर करण्यासाठी मदत केली. आजही आदिवासी लोक आयुर्वेदिक काम करतात. लांबून लोक त्यांच्याकडे येतात. त्यातील काही औषधे हे आयुर्वेद शास्त्रात आणता येतील का त्याचा विचार केला जाणार आहे. आदिवासी बांधवांकडे असणाऱ्या गावठी उपचार पद्धतीला आयुर्वेद औषधात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची घोषणा नरहरी झिरवळ यांनी केली आहे.

अन्न व औषध विभाग मंत्री नरहरी झिरवळ यांच्या नावाचे नाशिक येथे बॅनर लावण्यात आले आहे. मात्र या बॅनरने सर्वांचे लक्ष वेधले आहे. या बॅनरवर आदिवासी विकास मंत्री असा उल्लेख झिरवळ यांचा करण्यात आला आहे. मुळात नरहरी झिरवळ यांना महायुतीच्या मंत्रिमंडळात अन्न व औषध विभाग देण्यात आले आहे, असे असताना देखील नाशिक येथे आदिवासी विकास मंत्री असा उल्लेख करत त्यांचे बॅनर लावण्यात आले आहेत. तसेच मला आदिवासी खाते देण्यात येईल असे वाटत होते मात्र ते नाही मिळाले अशी खंत देखील नरहरी झिरवळ यांनी बोलून दाखवली आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये कमांडोसाठी बोगस भरती




**छत्रपती संभाजीनगर :** येथे महाराष्ट्र कमांडो फोर्सचे जवान बनवण्याचे आमिष दाखवून बोगस भरती घेण्यात आली असल्याचे समोर आले आहे. पोलिस भरतीप्रमाणेच उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली. त्यानंतर जे उमेदवार या भरती प्रक्रियेत पात्र ठरले त्यांना पैशांची मागणी केली आणि हा मोठा घोटाळा उघडकीस आला. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. विशाल मोहन देवळी, विकास बापू माने आणि सनी लाला बागाव असे या आरोपींचे नाव आहे.

शहरातील मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर १७ डिसेंबरच्या सकाळी भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. कडक्याच्या थंडीत देखील भल्या पहाटे उमेदवार या भरतीसाठी हजर होते. सर्व उमेदवारांना एका रांगेत उभे केले आणि सगळी शिस्त समजावून सांगिली. तसेच पगार निकष देखील सांगण्यात आले. उमेदवारांकडून कागदपत्रे सुद्धा गोला केली व मैदानी चाचणी घेतली. यात ९२ जणांना संपर्क करत २५ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता त्याच मैदानावर अंतिम प्रक्रियेसाठी बोलावले आणि यावेळेस त्यांनी ६ हजारांची मागणी केली. तरुणांना शंका आली आणि यातच त्यांचा भांडाफोड झाला.

१७ डिसेंबर रोजी झालेल्या भरतीमध्ये मैदानी चाचणी घेण्यात आली. यात १२०० मीटर धावणे (२५ गुण), गोळा फेक (२५ गुण) अशी रचना करण्यात आली होती. यात पास झालेल्या उमेदवारांना फोन करून २५ डिसेंबर रोजी मैदानात बोलावले व येताना नियुक्त उमेदवारांनी ६ हजार रुपये घेऊन येण्याच्या सूचना देखील दिल्या. हे ६ हजार रुपये नियुक्ती आणि गणवेशासाठी असल्याचे त्यांनी सांगितले होते. यावेळी बागुल आणि त्याच्या मित्रांना संशय आला. मात्र, तोपर्यंत सर्वांनीच ६ हजार रुपये ऑनलाईन पाठवले होते. पैसे कशासाठी अशी विचारणा करताच आरोपींची बोबडी वळली आणि लगेच संतप्त उमेदवारांनी त्यांना पकडून सीटी चौक पोलिस ठाण्यात हजर केले. यावेळी निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या आदेशावरून निरीक्षक दिलीप चंदन यांनी गुन्हा दाखल करत तिघांना अटक केली.

यातील आरोपी विशालचा भाऊ हा लष्करात जवान आहे. सनीने सिव्हिल इंजिनियरिंगचे शिक्षण घेतले आहे. तसेच विशाल आणि विकास हे दोघे बारावी पास आहेत. मैदानावर येणाऱ्या उमेदवारांना विश्वास बसावा म्हणून हे तिघे आरोपी नेहमीच लष्कराच्या गणवेशात असायचे. यांचा हा भांडाफोड झाला असून आता त्यांना अटक करण्यात आली आहे.

## कुणाच्याही नादी लाग, पण या रगेलाच्या नादी लागू नको : सुरेश धस

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाच्या मुद्यावरून आता महायुतीमधील घटकपक्षांच्या नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडण्यास सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी यासंबंधी मंत्री धनंजय मुंडे यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याप्रकरणी भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर टीका केली.

त्यानंतर धस यांनी त्यांना 'आपल्या नादी लागल्यास लै महागात पडेल' असा धमकीवजा इशारा दिला. आता मिटकरी यांनी त्यांच्या या धमकीला गांभिर्याने घेत पोलिसांना या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याची विनंती केली आहे.

अमोल मिटकरी यांनी सुरेश धस यांच्यावर धनंजय मुंडे यांचे राजकारण संपवण्याची सुपारी घेतल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे संतापलेल्या धस यांनी त्यांना आपल्या नादी न लागल्याचा इशारा दिला आहे. 'अमोल मिटकरी फार लहान आहे. माझी त्याला एकदा विनंती आहे की, अमोल तू कोणाच्याही नादी लाग, पण या रगेलाच्या नादी लागू नको. तुला लै महागात पडेन. मी एकदा आता त्याचे ऐकून घेतो. वडीलकीच्या नात्याने त्याला एकदा समज देतो. तुझे कुणीकडेही दुकान चालव, पण माझ्याकडे दुकान चालवू नको', असा इशारा सुरेश धस यांनी दिला आहे.

सुरेश धस यांच्या या इशाऱ्यानंतर अमोल मिटकरी यांनी पुन्हा त्यांच्यावर पलटवार केला. 'आमदार सुरेश धस यांच्या धमकीला पोलिसांनी गांभीर्याने घ्यावे. महागात पडेल म्हणजे काय? यावरून यांची एकंदरीत कारकीर्द लक्षात येते. गृह विभाग व पोलीस प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन धस यांच्यावर योग्य ती कारवाई करावी,' अशी मागणी मिटकरी यांनी एका ट्विटद्वारे केली. मिटकरी यांच्या प्रत्युत्तरामुळे या दोन्ही आमदारांतील कलगीतुरा आणखी वाढण्याची चिन्हे आहेत.

अमोल मिटकरी म्हणाले होते की, केवळ पंकजाताई व धनंजय मुंडे हे दोघे बहीण भाऊ एकत्र आल्याने महायुतीचे व विरोधातील आमदार एकत्र येऊन आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून जाणीवपूर्वक धनंजय मुंडे यांच्या राजकीय कारकिर्दीला संपवण्याचे पद्धतशीर काम करत आहेत. त्यासाठी एक सामाजिक कार्यकर्त्या कामाला लावल्या आहेत.

संजय राऊत व सुरेश धस यांनी यात उपमुख्यमंत्री अजितदादाना टार्गेट करने सुरु केले आहे. या हत्याकांडातील आरोपी फासावर गेले पाहिजे ही धनंजय मुंडे यांची सुरुवातीपासून भूमिका असताना या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे राजकारण संपवण्याची सुपारी घेतल्याच्या भूमिकेत धस आले आहेत, असे मिटकरी यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ डिसेंबर २०२४


## जीवनात यशस्वी होण्यासाठी डेडिकेशनला महत्त्व द्या - दिग्विजय पवार




**कन्नड (अरुण थोरात):** येथील जयकाली कॉम्पुटर टायपिंग च्या वतीने साने गुरुजी जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी अध्यक्ष स्थानी प्राचार्या अनिता पवार या होत्या तर प्रमुख पाहुणे युवा मार्गदर्शक दिग्विजय सचिन पवार (फिनलॅंड)हे होते. यावेळी विद्यार्थ्यांशी हितगुज साधतांना ते म्हणाले की, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मोटिव्हेशन पेक्षा डेडिकेशनला महत्त्व द्या. कारण मोटिवेशन दोन प्रकारचे असते.

एक जे सतत (कॉन्स्टंट ) लागते, पुन्हा पुन्हा लागते आणि दुसरे लॉन्ग टर्म असते ज्याची नेहमी गरज पडत नाही कारण ते तुम्हाला यशस्वी होण्याकरता सतत आठवण देत राहते. जीवनात अनेक प्लॅन तयार ठेवा परंतु तुमचा फोकस मात्र एकाच गोष्टीवर असू द्या, पुढे ते म्हणाले की, नोकरीची मानसिकता बदला. परदेशात नोकरीपेक्षा खास करून फिनलॅंड मध्ये नोकरीपेक्षा एंटरप्रेनरशीप या गोष्टीला फार महत्त्व आहे, कारण क्रिएटिव्ह आयडिया या ठिकाणी उपयोगी पडतात.

या सोबत वाचन वाढवा मनन करा. कुठल्याही कामात सातत्य ठेवा, सोशल मीडियाचा वापर फक्त योग्य कामासाठीच करा, टाइमपास बंद करा, तसेच कोणतेही काम करताना पाच वर्षानंतर मी कुठे असेल हे ठरवून काम सुरू ठेवा. कामात सातत्य ठेवा, कामात आवड निर्माण करा, नोकरीच्या मागे न लागता आवडीचे क्षेत्र शोधून त्यात यशस्वी व्हा अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी विचार पिठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत पवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन श्रावणी करवंदे हिने केले तर आभार शिवानी ढोणे हिने मानले. कार्यक्रमास क्लास सर्व विद्यार्थी हजर होते.

कन्नडचे दिग्विजय सचिन पवार देत आहेत, युरोपात एंटरप्रेनरचे धडे, सध्या जगात शिक्षणाच्या क्षेत्रात क्रमांक एकवर असलेला देश फिनलॅंड येथे टेम्पर युनिव्हर्सिटी मध्ये उच्च शिक्षण घेत आहे. तसेच त्यांची विद्यापीठात/'युनिव्हर्सिटी स्टुडन्ट अँबेसेडर' म्हणून निवड झाली आहे.

या अंतर्गत त्याला 'चेक रिपब्लिक' देशातील सिलिकॉन व्हॅली म्हणून ओळख असलेल्या 'ब्रुनो युनिव्हर्सिटी' मध्ये युरोप आणि अमेरिकेतील विद्यार्थ्यांना 'बिझनेस आयडिया आणि प्रेझेंटेशन' यासाठी आमंत्रित केले होते. तसेच सध्या फिनलॅंड येथिल १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांना एंटरप्रेनरशिपचे धडे देत आहे.

## शालेय सॉफ्ट बॉल क्रीडा स्पर्धेसाठी समृद्धी शिंदे ची निवड



**कन्नड (अरुण थोरात):** ४८ व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्ट बॉल क्रीडा स्पर्धेसाठी समृद्धी प्रवीण शिंदे ची निवड करण्यात आली आहे. जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालया च्या वतीने आयोजित ४८ व्या शालेय सॉफ्टबॉल १७ वर्षाखालील मुलींच्या क्रीडा स्पर्धा दि. ५ ते ९ जानेवारी दरम्यान होत आहेत.

यित साधारण स्पर्धेसाठी कन्नड तालुक्यातील हस्ता येथील राधाबाई माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील खेळाडू ची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ उदय डोंगरे, सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव गोकुळ तांदळे, गणेश ब्बयटू, सचिन बोर्डे, संतोष अवचार, भीमा मोरे, लता लोंढे, कन्नड तालुक्याचे क्रीडा अधिकारी सचिन पुरी, पुनम नवगिरे, खंडू यादवराव, राम मालोद, गणेश पळवदे, संस्थेचे अध्यक्ष आबासाहेब शिंदे, विजय बारवाल, मुक्तानंद गोस्वामी, रवी कुमार सोनकांबळे, अविनाश काळे, श्याम खोसरे, राकेश निकम, करण राठोड, सचिन शेळके, वसीम शेख आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.






## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेची शैक्षणिक भेट



**चिकलठाणा :** दिनांक २७ डिसेंबर रोजी तारांगण व छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तू संग्रहालय येथे आयोजित करण्यात आली.

या भेटीसाठी शाळेचे मुख्याध्यापक शिंदे सर, राठोड सर, पठाण सर, श्रीमती शिंदे मॅडम, भोसले मावशी यांचे सहकार्य लाभले.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ डिसेंबर २०२४

# अखिल महाराष्ट्र गुरव समाज परिषदेच्या वतीने मान्यवरांचा गौरव





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** अखिल महाराष्ट्र मध्यवर्ती गुरव समाज परिषद, पुणे, सोलापूर जिल्हा सकल गुरव संस्था, वेळापूरकर यांच्या सहयोगातून गुरव बंधुंच्या स्मरणार्थ नुकताच ज्येष्ठ विचारवंत परिवर्तनवादी चळवळीतील बिनीचे संघर्ष योद्धा आदरणीय डॉ. बाबुराव गुरव, तासगाव यांच्या अध्यक्षतेखाली समाजातील मान्यवरांना विविध पुरस्काराने गौरविण्यात आले.

ठाणे ,मुंबई, पुणे, संभाजीनगर, अमरावती , पिंपरी चिंचवड ,पेन रायगड ,आष्टी येथे कार्य करत असणाऱ्या संस्थांचा यथोचित सन्मान करण्यात आला.धाराशिव जिल्ह्यातील महेश मोटे, ऍड. स्वाती नळेगावकर आणि रवी तीर्थकर यांचा संघर्ष योद्धा पुरस्काराने यथोचित गौरव केला.

बालरोगतज्ञ डॉक्टर नामदेव बिराजदार आणि त्यांचे पिताश्री लातूर जिल्हा परिषद सदस्य तथा विद्यमान सरपंच यांना समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.

सन्माननीय हरिश्चंद्र धोत्रे, उद्योजक तथा अध्यक्ष एमआयडीसी ,कोल्हापूर माननीय बाळासाहेब गुरव ,कवठेमंकाळ, माननीय चंद्रकांत पुजारी माननीय शशिकांत पाटील खरसुंडी, पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा ओबीसी चळवळीचे नेते सुनील गुरव,माननीय भानुदास पानसरे , पुणे यांचाही याप्रसंगी गौरव करण्यात आला.

संभाजीनगर लोकमतचे सन्माननीय स.सो. खंडाळकर यांनी समाजातील समस्यांचे आकलन करून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत आपण ओबीसी म्हणून एक झाले पाहिजे असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर बाबुराव गुरव यांनी उपस्थित समाज बांधवांना आपण कोण आहोत ? हे स्वतःला ओळखून शिक्षणाची कास धरण्याचे आवाहन केले.

जोडी जमली साताऱ्याच्या कवयित्री सुरक्षा साखरे आणि कवी राजेंद्र गुरव औंध यांनी ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन केलं.

# अखिल भारतीय धम्म परिषदेत झाले महत्वपूर्ण ठरावांचे वाचन

**उमरगा (डॉ. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील नुकतीच अखिल भारतीय धम्म परिषदेची सांगता झाली.किल्लारी येथील भदंत धम्मसार थेरो , कराळी येथील भदंत सुमंगल आणि जालना येथील भदंत शिवली अंगुलीमाल यांची समायोचीत धम्मदेशना झाली.

या धम्म परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून मा.पंचशील डावकर, मा.अजित गायकवाड, सरपंच दिपक जोमदे ,उपसरपंच संजय बिराजदार तसेच कैलासजी शिंदे,दिलीप भालेराव आदी उपस्थित होते.

आधुनिक युगात मानवांचे जीवन अधिक संपन्न व समृद्ध करण्यासाठी धम्म हाच एकमेव पर्याय असल्याचे नमूद करत पंचशील डावकर यांनी धम्माचे सुरेख विश्लेषण केले.

अंधश्रद्धा ,कर्मकांड ,जुन्या रुढी आणि परंपरांना मूठमाती देऊन आधुनिक युगात स्त्रियांनी सार्वजनिक जीवनात पुढे आले पाहिजे.

स्त्री ही सृजनशील आहे.ती सर्वच क्षेत्रात सर्वश्रेष्ठ आहे.पुरुषांनी सुध्दा तिच्याकडे पहाण्याचा आपला पारंपरिक दृष्टीकोन आता बदलला पाहिजे असे सांगून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या बाबतीत दिलेले अतुलनीय योगदान विस्तृतपणे सांगितले.सुरुवातीला भालचंद्र लोखंडे यांनी धम्म परिषदेचे प्रास्ताविक केले.

धम्म परिषदेचे संयोजक डॉ.कमलाकर कांबळे यांनी यांनी परिषदेची सविस्तर भूमिका समजावून सांगितली.सूत्रसंचालन शाहूराजे भोसले यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.नागसेन कांबळे यांनी मांडले.धम्म परिषदेच्या शेवटी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी खालील ठरावंचे वाचन केले आणि राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

(1) केंद्र सरकारने पाली आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला त्याबद्दल केंद्र सरकारचे अभिनंदन करत आहे. (2)बिहारमधील गया येथील महाबोधी महविहार बौध्छे लोकांकडे असून ते बौध्दाकडे सुपूर्द करावे. (3) महाविद्यालय आणि विद्यापीठातील पाली भाषा विषय व विभागाला शंभर टक्के अनुदान द्यावे. (4) महाराष्ट्रात अनेक भाषा विद्यापीठ आहेत.त्याचप्रमाणे पाली भाषेचे विद्यापीठ उभारण्यात यावे. (5) महाराष्ट्रात गावागावात धम्म परिषदा भरत आहेत ,यातून पंचशीलांचे पालन करण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले जाते हे लक्षात घेऊन शासनाने परिषदेसाठी मूलभूत सुविधा देण्यात याव्यात. (5) यूपीएससी व एमपीएससी परीक्षेत पूर्ववतपणे पाली भाषेचा समावेश करावा. (6) परभणी येथे न्यायालयीन कोठडीत मृत्युमुखी पडलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूचा निषेध केला.

त्याची सखोल चौकशी करून मृत्यूस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही करावी.

